**महाराष्ट्र राज्यामध्ये सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सुदृढ करण्यासाठी "प्रगती (Primary Healthcare Reimagined with Advanced Governance and Accessible Technology Integration)" प्रकल्प सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सन २०२६-२०३१ या कालावधीत राबविण्यास तसेच सदर प्रकल्पासाठी आशियाई विकास बँकेकडून (ADB) कर्ज प्राप्त करण्यास व त्यासाठी आवश्यक राज्य शासनाचा निधी उपलब्ध करून देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय, क्रमांकः एडीबी-२०२५/प्र.क्र.१३८/पासू-२**
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : १५ सप्टेंबर, २०२६.

**वाचा :**

१) मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील बैठक, दिनांक २६.०३.२०२५ चे इतिवृत्त.

२) मा.मंत्रिमंडळ निर्णय दि. ०८.०९. २०२६.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्याने सार्वजनिक आरोग्य क्षेत्रामध्ये गेल्या काही दशकांत उल्लेखनीय प्रगती केली असून माता व बाल आरोग्य, संसर्गजन्य रोग नियंत्रण, लसीकरण, आपत्कालीन आरोग्य सेवा आणि राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे अनेक आरोग्य निर्देशांकांमध्ये सुधारणा झाली आहे.

राज्यामध्ये प्रामुख्याने असंसर्गजन्य आजार उदा. उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, पक्षाघात, कर्करोग, मानसिक आरोग्य विकार, दीर्घकालीन मूत्रपिंड व श्वसनविकार यांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. या आजारांचे वेळेवर निदान व उपचार न झाल्यामुळे रुग्णाचा अकाली मृत्यू, अपंगत्व, नागरीकांच्या उपचारावरील आर्थिक भार आणि आरोग्य व्यवस्थेवरील ताण वाढत आहे.

राज्यामध्ये विविध डिजिटल आरोग्य प्रणाली अस्तित्वात असल्या तरी त्या स्वतंत्र स्वरूपात कार्यरत असल्यामुळे माहितीची पुनरावृत्ती होणे, अपूर्ण रुग्ण नोंदी व उपचारातील सातत्याचा अभाव यामुळे धोरणात्मक नियोजनासाठी आवश्यक वस्तुस्थितीदर्शक माहिती उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होतात. प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, वेळेवर व अचूक निदान, मानक उपचार, प्रभावी संदर्भ व्यवस्था, उपचार सातत्य, डिजिटल प्रशासन व आरोग्य व्यवस्थेची कार्यक्षमता वाढविणे, नागरिकांचा आरोग्यावरील स्वखर्च कमी करणे तसेच शाश्वत विकास ध्येय-३ व सर्वांसाठी आरोग्य सुविधा साध्य

करण्यास व विकसित महाराष्ट्र २०४७ ची ध्येय साध्य करण्यासाठी सर्वसमावेशक आरोग्य सुधारणा प्रकल्प राबविण्याचे प्रस्तावित आहे.

महाराष्ट्रातील बहुसंख्य जिल्ह्यांमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा रुग्णालये वैद्यकीय शिक्षण विभागाकडे वैद्यकीय महाविद्यालयांच्या स्थापनेसाठी कायमस्वरूपी हस्तांतरित करण्यात आली आहेत. त्यामुळे संबंधित जिल्ह्यांमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत सर्वसामान्य नागरिकांना उपलब्ध होणाऱ्या द्वितीय स्तरावरील आरोग्य सेवांमध्ये तूट निर्माण झाली आहे.

त्यानुषंगाने राज्यातील प्राथमिक, द्वितीय व तृतीय स्तरावरील आरोग्य सेवा एकात्मिक स्वरूपात बळकट करण्यासाठी “प्रगती (PRAGATI- Primary Healthcare Reimagined with Advanced Governance and Accessible Technology Integration)” हा सर्वसमावेशक आरोग्य सुधारणा प्रकल्प राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्रातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी “प्रगती (PRAGATI - Primary Healthcare Reimagined with Advanced Governance and Accessible Technology Integration)” हा राज्यस्तरीय सार्वजनिक आरोग्य सुधारणा प्रकल्प सन २०२६-२०३१ या कालावधीत राबविण्यासाठी एशियन डेव्हलपमेंट बँक (ADB) कडून कर्ज घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**१)** प्रकल्प राबविण्यासाठी एशियन डेव्हलपमेंट बँक व राज्याचा समभागी निधी साधारणपणे ७०:३० या प्रमाणात असेल. सदर प्रकल्पाची सुधारित किंमत रु.४२५० कोटी इतकी असून समभागी निधी मध्ये एशियन डेव्हलपमेंट बँकेचे कर्ज रु.२९७५ कोटी व राज्य शासनाचा निधी रु.१२७५ कोटी इतका राहील.

**२)** महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा आयुक्तालयामार्फत २०२६ ते २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीत सदर कार्यक्रम राबविण्यात येईल.

**३)** प्रगती (PRAGATI) प्रकल्पाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:

१) असंसर्गजन्य आजार (Non-Communicable Diseases-NCDs) प्रतिबंध, तपासणी (Screening), निदान व उपचार सेवांचे सार्वत्रिकीकरण आणि बळकटीकरण करणे.

२) असंसर्गजन्य आजारांमुळे होणारे अकाली मृत्यू आणि सामान्य नागरिकांचा आरोग्यावरील स्वखर्च (Out of Pocket Expenditure) कमी करणे.

३) महाराष्ट्र हेल्थ टेक्नॉलॉजी मिशन (Maharashtra Health Technology Mission-HTM) द्वारे डिजिटल आरोग्य सुविधा मजबूत करणे.

४) प्राथमिक, द्वितीय व तृतीय स्तरावरील आरोग्य संस्थांमध्ये प्रभावी संदर्भ सेवा साखळी (Continuum of Care) निर्माण करणे.

५) द्वितीय स्तरावरील आरोग्य संस्थांचे बळकटीकरण व नवीन आरोग्य संस्थांची उभारणी- द्वितीय स्तरावरील आरोग्य संस्थांच्या पायाभूत सुविधा विकसित करून गुणवत्तापूर्ण सेवा नागरिकांच्या जवळ उपलब्ध करून देणे.

६) सामाजिक आणि वर्तणूक बदल संवाद (Social and Behavioral Change Communication)- समुदाय सहभाग आणि प्रतिबंधात्मक आरोग्य सेवांविषयी जनजागृती करणे.

७) क्षमता बांधणी (Capacity Building) व आरोग्य मनुष्यबळ (Human Resource for Health) सक्षमीकरण.

## ४) प्रकल्पाचे प्रमुख घटक

### ४.१) असंसर्गजन्य आजार (NCD) व संबंधित सेवा

असंसर्गजन्य आजार प्रतिबंध, नियंत्रण उपचार सेवा सुविधा सक्षमीकरण यासाठी प्रकल्पांतर्गत पुढील प्रमुख घटकांवर विशेष भर देण्यात येईल;

१. उच्च रक्तदाब (Hypertension) व मधुमेह (Diabetes Mellitus) प्रतिबंध व नियंत्रण
२. हृदयविकार (Cardiovascular Diseases)
३. पक्षाघात (Stroke)
४. दीर्घकालीन फुफ्फुस विकार (COPD)
५. दीर्घकालीन मूत्रपिंड विकार (CKD)
६. सिकल सेल
७. अंधत्व नियंत्रण
८. बालवयीन असंसर्गजन्य आजार (Paediatric NCDs)
९. कर्करोग प्रतिबंध, तपासणी व उपचार
१०. मानसिक आरोग्य सेवा
११. उपशामक आरोग्य सेवा (Palliative Care) इ.
१२. वेळोवेळी शासन निश्चित करेल असे अन्य असंसर्गजन्य आजार.

असंसर्गजन्य आजार कार्यक्रमाच्या बळकटीकरणासाठी प्रगती प्रकल्पांतर्गत क्षेत्रीय आणि संस्था स्तरावर पुढील प्रमाणे उपाययोजना करण्यात येतील:-

सर्वेक्षण, साधन साहित्याची गरज निश्चिती आणि त्याप्रमाणे सर्व प्राथमिक आरोग्य संस्था, आयुष्मान आरोग्य मंदिरे व शहरी आरोग्य केंद्रांमध्ये आवश्यक तपासणी उपकरणे व

प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून देणे, आवश्यक औषधे व निदान साहित्याचा अखंडित पुरवठा सुनिश्चित करणे, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी (CHO), ANM, ASHA व इतर आरोग्य कर्मचाऱ्यांचे क्षमता विकास प्रशिक्षण देणे, ABHA आधारित डिजिटल रुग्ण नोंदणी, Electronic Health Records (EHR) सर्व आरोग्य संस्थेत राबवविणे, Artificial Intelligence (AI) चा आवश्यकतेनुसार वापर,सर्व स्तरावर डिजिटल सुविधा आणि कॉल सेंटरच्या माध्यमातून फॉलो अप प्रणाली-विकसित करणे या माध्यमातून उपाययोजना करण्यात येतील.

तसेच संदर्भ (Referral) व प्रत्यावर्तन (Return Linkage) यंत्रणा मजबूत करणे, नियमित उपचार पालन (Treatment Adherence) सुनिश्चित करणे, सर्व आरोग्य संस्थेत त्यांच्या स्तरानुसार (प्रथम, द्वितीय आणि तृतीय) उपरोक्त नमूद असंसर्गजन्य आजार तपासणी, निदान आणि उपचार सुविधा निर्माण करणे उदा. COPD/ दमा (Asthma) निदान व उपचार-Spirometry, Pulmonary Function Testing (PFT), टाईप-१ मधुमेह (Type-१ Diabetes Mellitus) तपासणी व निदान, इतर असंसर्गजन्य आजार उदा. सिकल सेल, हिमोफिलिया, थॅलेसेमिया, अंधत्व याबाबत सार्वत्रिक आरोग्य सुविधांचे प्राधान्याने प्राथमिक आणि द्वितीय स्तर सक्षमीकरण, मानसिक आरोग्य तपासणी व संदर्भ प्रणाली विशेषेकरून विकसित करणे तसेच दरवर्षी ३० वर्षे व त्यावरील सर्व पात्र नागरिकांची HT/DM साठी तपासणी आणि दर पाच वर्षांनी मुखाचा कर्करोग, गर्भाशय मुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग यांची तपासणी करण्यात येईल.

तसेच १२ व १३ वर्षे वयोगटातील मुलींमध्ये Human Papilloma Virus (HPV) लसीकरण करण्यात येईल. गृहआधारित (Home Based Palliative Care) उपशामक सेवा, ज्येष्ठ नागरिक, अंथरुणाला खिळलेले रुग्ण व अंतिम अवस्थेतील रुग्णांसाठी गृहभेटीद्वारे उपशामक सेवा उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच SBCC व IEC माध्यमातून जनजागृती करणे व "Golden Hour" मध्ये STEMI, STROKE निदान, संदर्भ सेवा सुविधा व अन्य तंत्रज्ञानाधारित, प्रतिबंधात्मक, लोकाभिमुख, जनभागीदारी आधारित इकोसिस्टीम उपलब्ध करण्यात येईल.

**४.२) महाराष्ट्र हेल्थ टेक्नॉलॉजी मिशन** (Maharashtra Health Technology Mission- HTM):

महाराष्ट्र राज्यामध्ये सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक कार्यक्षम, परिणामकारक, नागरिकाभिमुख व तंत्रज्ञानाधारित करण्याच्या उद्देशाने "प्रगती (PRAGATI)" प्रकल्पांतर्गत "महाराष्ट्र हेल्थ टेक्नॉलॉजी मिशन (Maharashtra Health Technology Mission - HTM)" राबविण्यात येईल. हे मिशन आयुष्मान भारत डिजिटल मिशन (Ayushman Bharat Digital Mission - ABDM) शी पूर्णतः

सुसंगत राहून राज्यातील सर्व सार्वजनिक आरोग्य संस्था, आरोग्य कार्यक्रम, क्षेत्रीय आरोग्य सेवा, आपत्कालीन वैद्यकीय सेवा, नागरिकाभिमुख सेवा तसेच व्यवस्थापन प्रणाली यांना एकात्मिक (Integrated) व परस्परसंवादी (Interoperable) डिजिटल आरोग्य परिसंस्थेमध्ये जोडणारे प्रमुख व्यासपीठ (Digital Backbone) म्हणून कार्य करेल. हे संपूर्ण आरोग्य व्यवस्थेचे डिजिटल परिवर्तन (Digital Transformation) घडवून आणण्याचे व्यापक उद्दिष्ट असलेले राज्यस्तरीय धोरणात्मक मिशन असेल.

मिशनची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे राहतील-

- DPDP (Digital Personal Data Protection) Act शी सुसंगत कार्यप्रणाली विकसित करणे.
- राज्यातील सर्व सार्वजनिक आरोग्य संस्थांचे एकात्मिक डिजिटल जाळे (Integrated Digital Health Network) निर्माण करणे.
- सर्व नागरिकांसाठी ABHA आधारित डिजिटल आरोग्य अभिलेख (Digital Health Records) उपलब्ध करून देणे, सर्व आरोग्य संस्थांची Health Facility Registry (HFR) मध्ये नोंदणी व प्रमाणीकरण पूर्ण करणे, सर्व वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व आरोग्य व्यावसायिकांची Health Professional Registry (HPR) मध्ये नोंदणी करणे. HMIS - शासकीय व अन्य संस्थांसाठी विकसित करुन परिचलन करणे.
- प्राथमिक, द्वितीय स्तर व तृतीय स्तरावरील आरोग्य सेवांमध्ये रुग्णांच्या उपचारांचा सातत्यपूर्ण प्रवास (Continuum of Care) सुनिश्चित करणे.
- वास्तविक वेळेतील (Real-Time) माहितीवर आधारित नियोजन, पर्यवेक्षण व निर्णय प्रक्रिया सक्षम करणे.
- कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI), टेलिमेडिसिन, क्लिनिकल निर्णय सहाय्य प्रणाली (Clinical Decision Support System - CDSS) व डिजिटल विश्लेषण (Analytics) यांचा प्रभावी वापर करणे.
- Network Infra, IT Infra, IT Support Services सक्षम करणे.

महाराष्ट्र हेल्थ टेक्नॉलॉजी मिशन अंतर्गत पुढील प्रमाणे प्रमुख उपक्रम हाती घेण्यात येतील.

- या मिशनअंतर्गत संपूर्ण रुग्ण सेवा प्रक्रियेचे (Patient Care Journey) डिजिटल रूपांतरण करण्यात येईल. यामध्ये पुढील बाबींचा समावेश असेल, ऑनलाइन नोंदणी (Digital Registration), बाह्यरुग्ण व आंतररुग्ण व्यवस्थापन, प्रयोगशाळा अहवाल, रेडिओलॉजी सेवा, औषध वितरण, डिजिटल प्रिस्क्रिप्शन, संदर्भ (Referral) व प्रत्यावर्तन (Return Linkage), डिस्चार्ज सारांश, इलेक्ट्रॉनिक आरोग्य अभिलेख (Electronic Health Records - EHR), वैयक्तिक आरोग्य अभिलेख (Personal Health Records - PHR) ई. यामुळे प्रत्येक नागरिकाचा आरोग्य इतिहास राज्यातील कोणत्याही अधिकृत आरोग्य संस्थेमध्ये सुरक्षितपणे उपलब्ध होईल व उपचारामध्ये सातत्य राखले जाईल.

- महाराष्ट्र हेल्थ टेक्नॉलॉजी मिशन अंतर्गत एक संयुक्त डिजिटल प्रणाली आयुष्मान भारत डिजिटल मिशन (ABDM) च्या परस्परसंवाद (Interoperability) मानकांनुसार विकसित करण्यात येईल. यात राज्यातील विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय आरोग्य कार्यक्रमांशी निगडीत आणि इतर उपलब्ध पोर्टल्स  एकाच संयुक्त डिजिटल प्रणाली वर उपलब्ध होतील उदा. जननी, RCH, निक्षय (Nikshay), राष्ट्रीय असंसर्गजन्य आजार कार्यक्रम (NP-NCD), सिकल सेल कार्यक्रम, आरोग्य विमा योजना, रोग सर्वेक्षण प्रणाली, HMIS, HRMS, ई-सुश्रुत (e-Sushrut). या एकात्मिक प्रणालीमुळे माहितीची पुनरावृत्ती (Duplication) कमी होईल, माहितीची गुणवत्ता सुधारेल आणि विविध कार्यक्रमांमधील समन्वय अधिक प्रभावी होईल.
- आधुनिक डिजिटल आरोग्य सेवा-नागरिकांना अधिक सुलभ (accessible & affordable), गुणवत्तापूर्ण व तज्ज्ञ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी डिजिटल उपाययोजना राबविण्यात येतील उदा. टेलिमेडिसिन (Telemedicine), टेली-रेडिओलॉजी (Tele-Radiology), कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित तपासणी, AI आधारित निदान सहाय्य, नागरिक सहाय्य चॅटबॉट (Citizen Chatbot), डिजिटल फॉलो-अप प्रणाली ई. व अन्य अनुषंगिक बाबी.
- राज्यातील STEMI, Stroke, Trauma ई. आपत्कालीन वैद्यकीय सेवा अधिक सक्षम करण्यासाठी डिजिटल प्रणालीमध्ये सुसूत्रीकरण आणि एकत्रीकरण करण्यात येईल, यात १०४ आरोग्य हेल्पलाईन, १०२ रुग्णवाहिका सेवा, १०८ आपत्कालीन सेवा, Tele-MANAS, संदर्भ प्रणाली, रुग्णालये हे डिजिटल प्रणालीमध्ये एकत्रित जोडल्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेवर उपचार उपलब्ध होऊन प्रतिसादाचा कालावधी (Response Time) कमी होईल.
- केंद्रीय आदेश व नियंत्रण केंद्र-“संवाद” (Central Command and Control Centre) ची निर्मिती करण्यात येईल.  हे केंद्र राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे वास्तविक वेळेतील संचालन (Real-Time Operations Centre) म्हणून कार्य करेल. या केंद्रामध्ये पुढील सुविधा उपलब्ध असतील, राज्यस्तरीय कॉल सेंटर, सार्वजनिक आरोग्य डॅशबोर्ड, CCTV आधारित सुविधा निरीक्षण, तक्रार निवारण प्रणाली, संदर्भ व्यवस्थापन, आपत्कालीन प्रतिसाद, सेवा वितरणाचे निरीक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित विश्लेषण, रुग्णांचा पाठपुरावा आणि रूग्ण संवाद तसेच आरोग्यसेवेप्रति जनता आणि रूग्ण प्रतिसाद/समाधान पडताळणी ई.  यामुळे राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील आरोग्य सेवेची स्थिती वेळेत पाहणे व आवश्यक त्या तात्काळ सुधारात्मक उपाययोजना करणे शक्य होईल.
- आवश्यकतेप्रमाणे Network Infra, IT Infra, IT Support Services बाबत निर्मिती, सक्षमीकरण व अनुषंगिक कामे हाती घेण्यात येतील.

**४.३) पायाभूत सुविधा** -

प्रकल्पांतर्गत मंजूर आरोग्य संस्थांमध्ये आवश्यक civil infrastructure, सेवा सुविधा व प्रकल्पाच्या इतर घटकांना आवश्यक पायाभूत सुविधा विकसित/बळकट करण्यात येतील. संबंधित

कामांची निवड, DPR, design, BOQ, प्रशासकीय/तांत्रिक मान्यता, निविदा, बांधकाम, गुणवत्ता नियंत्रण व commissioning ही कार्यवाही प्रचलित शासन नियम व ADB requirements नुसार करण्यात येईल. पुढील जिल्ह्यात जिल्हा रुग्णालय निर्माण करणे, सध्याच्या रुग्णसंस्थेचे श्रेणीवर्धन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | जिल्हा | आरोग्य संस्था | मान्य आकृतीबंधानुसार आवश्यक पदे | अस्तित्वातील पदे | नव्याने निर्माण करावयाची पदे | नवनिर्मित पदांसाठी अपेक्षित खर्च (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | कोल्हापूर | ५०० खाटांचे जिल्हा रुग्णालय | ५९४ | ० | ५९४ | ३१,२५,३०,२५०/- |
| २. | नांदेड | ५०० खाटांचे जिल्हा रुग्णालय | ५९४ | ० | ५९४ | ३१,२५,३०,२५०/- |
| ३. | नागपूर | १०० खाटांवरुन ३०० खाटांचे जिल्हा रुग्णालय | ४४५ | २१० | २३५ | १२,१०,१५,५००/- |
| ४. | लातूर | १०० खाटांवरुन ३०० खाटांचे जिल्हा रुग्णालय | ४४५ | २१० | २३५ | १२,१०,१५,५००/- |
| ५. | पुणे | २०० खाटांचे विशेषोपचार संदर्भ सेवा रुग्णालय | ७७२ | ० | ७७२ | ६०,३३,५८,०३२/- |

४.४) **सामाजिक आणि वर्तणूक बदल संवाद** (SBCC-Social and Behavioral Change Communication) **आणि क्षमता बांधणी** (Capacity Building)

"प्रगती" प्रकल्पाचा एक महत्त्वाचा उद्देश हा नागरिकांना आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारण्यासाठी प्रेरित करणे, शासकीय आरोग्य सेवांवरील विश्वास वाढविणे आणि सार्वजनिक सहभाग (Community Participation) सशक्त करणे हा आहे.

असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना, जोखीम घटकांबाबत जनजागृती, नियमित तपासणी, वेळेवर उपचार आणि उपचारांचे पालन (Treatment Adherence) याबाबत व्यापक Information,Education, and Communication (IEC) व वर्तन परिवर्तन संवाद (Behaviour Change Communication - BCC) मोहिमा राबविण्यात येतील.

त्याच प्रमाणे "प्रगती" प्रकल्पांतर्गत आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल आरोग्य प्रणाली, टेलिमेडिसिन, प्रगत निदान सुविधा व नवीन उपचार पद्धतींचा प्रभावी वापर सुनिश्चित

करण्यासाठी सर्व स्तरांवरील आरोग्य मनुष्यबळाचे क्षमता बांधणी कार्यक्रम विभागातंर्गत अथवा अन्य योग्य संस्थांच्या माध्यमातून घेण्यात येणार आहे.

या प्रकल्पा अंतर्गत प्रमुख SBCC उपक्रम हे जनतेच्या वर्तणुकीत आरोग्यदायी सुधार करणे हा राहणार आहे यात मुख्यत्वे, निरोगी जीवनशैलीचा प्रसार, तंबाखू व मद्य सेवन प्रतिबंध, नियमित व्यायाम व संतुलित आहार, उच्च रक्तदाब, मधुमेह व कर्करोग तपासणी, मानसिक आरोग्य जनजागृती, HPV लसीकरण, माता व बाल आरोग्य जागरूकता, सार्वजनिक आरोग्य सुविधांचा वापर वाढविणे ई. यांचा समावेश असणार आहे. क्षमता बांधणी (Capacity building) कार्यक्रम अंतर्गत डिजिटल आरोग्य प्रणाली वापर, Artificial Intelligence (AI) वापर, Telemedicine वापर , NCD निदान व उपचार प्रोटोकॉल, मानसिक आरोग्य, पॅलिएटिव्ह केअर, जैववैद्यकीय उपकरणांचा वापर ई बाबींवर भर देण्यात येणार आहे.

## ५) राज्यस्तरीय सुकाणू समिती (State Level Steering Committee)

प्रकल्पाच्या धोरणात्मक मार्गदर्शनासाठी पुढीलप्रमाणे राज्यस्तरीय सुकाणू समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर समिती प्रकल्पाच्या धोरणात्मक दिशा, inter-departmental coordination, प्रमुख अडचणींचे निराकरण, वार्षिक कृती आराखडा व प्रमुख milestones चा आढावा घेईल. समितीची प्रस्तावित रचना पुढीलप्रमाणे राहील-

**राज्यस्तरीय सुकाणू समितीची रचना**

| पद | भूमिका |
|---|---|
| मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण | अध्यक्ष |
| मा. राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण | सह-अध्यक्ष |
| अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव (१), सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, MITRA | सदस्य |
| प्रधान सचिव/सचिव (२), सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य |
| प्रधान सचिव/सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| प्रधान सचिव/सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| प्रधान सचिव/सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग | सदस्य |
| प्रधान सचिव/सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग | सदस्य |
| आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, NHM | सदस्य |
| आयुक्त, शहरी आरोग्य | सदस्य |

| | |
|---|---|
| संचालक-(२), पुणे | सदस्य |
| सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य |
| संचालक-(१) तथा प्रकल्प संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय | सदस्य सचिव |

**राज्यस्तरीय सुकाणू समितीची प्रमुख कार्ये पुढीलप्रमाणे आहेत-**

i) प्रकल्पाच्या धोरणात्मक अंमलबजावणीस दिशा व मार्गदर्शन देणे.

Ii) विविध विभाग/अंमलबजावणी यंत्रणांमधील समन्वय सुनिश्चित करणे.

iii) वार्षिक कृती आराखडा, procurement plan, financial plan व प्रमुख milestones चा आढावा घेणे.

iv) प्रकल्पातील धोरणात्मक/आंतरविभागीय अडचणींचे निराकरण करणे.

v) प्रकल्पाच्या KPIs, परिणाम व आर्थिक/भौतिक प्रगतीचा त्रैमासिक व वार्षिक आढावा घेणे.

vi) PMU/PIU कडून सादर होणाऱ्या महत्त्वाच्या अहवालांवर निर्णय घेणे.

vii) ADB/भारत सरकारच्या review missions व महत्त्वाच्या compliance बाबींचा आढावा घेणे.

viii) आवश्यकतेनुसार प्रकल्पाच्या घटकांमध्ये बदल/पुनर्संरचना करण्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारस करणे.

६) **प्रकल्प व्यवस्थापन कक्ष** (PMU): -

या प्रकल्पाचे सनियंत्रण, आर्थिक व तांत्रिक मार्गदर्शन आणि “ADB व मित्रा” यांच्याशी समन्वय साधण्यासाठी राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (Project Management Unit - PMU) कार्यरत राहील. सदर प्रकल्प व्यवस्थापन कक्ष प्रमुख म्हणून संचालक-१, मुंबई तथा प्रकल्प संचालक हे राहतील. सदर कक्ष प्रशासकीय विभाग स्तरावर कार्यरत राहील.

प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (Project Management Unit) ची भूमिका-

i) प्रकल्प अंमलबजावणी योजना (Project Implementation Plan) व वार्षिक कार्य योजना (annual work plans) तयार करणे व देखरेख करणे.

ii) ADB, परराष्ट्र व्यवहार विभाग (DEA), वित्त विभाग, नियोजन विभाग व संबंधित विभागांशी समन्वय साधणे.

iii) खरेदी, वित्तीय व्यवस्थापन, वितरण व करार व्यवस्थापन यांचे एकत्रित पर्यवेक्षण.

iv) PIUs च्या कामकाजाचे समन्वय.

v) तृतीय-पक्ष मूल्यमापन (Third Party Evaluation), वित्तीय लेखापरीक्षण (Financial Audit), सामाजिक/पर्यावरणीय निरीक्षण आणि KPIs च्या आधारे त्रैमासिक व वार्षिक प्रगतीचे

परिणाम-मूल्यमापन (Social/Environmental monitoring व outcome evaluation) चे समन्वय.

vi) वार्षिक अर्थसंकल्पिय तरतूद, खर्चाला सक्षम प्राधिकाऱ्याची प्रशासकीय/ तांत्रिक मान्यता याबाबत प्रस्ताव सादर करणे.

**(७) प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU):-**

आरोग्य सेवा आयुक्तालय हे या प्रकल्पाचे मुख्य अंमलबजावणी प्राधिकरण (Implementing Agency) म्हणून कार्य करेल. आयुक्त, आरोग्य सेवा यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्पाची अंमलबजावणी सुनिश्चित करेल आणि शासनास नियमित प्रगती अहवाल सादर करेल. त्यांना सहाय्यभूत ठरण्यासाठी आणि त्यांच्या अधिनस्त कार्यान्वयन यंत्रणेला सहाय्य करण्यासाठी आयुक्त, आरोग्य सेवा यांच्या अधिनस्त (१) डिजीटल आरोग्य व नवोपक्रम प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (Digital Health PIU) (२) पायाभूत सुविधा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (Infrastructure PIU) (३) प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (साधनसामुग्री उपलब्धता आणि वापर) (Procurement PIU) (४) तांत्रिक प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (Technical PIU) स्थापन करण्यात येतील.

**प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) चे कार्यक्षेत्र व भूमिका-**

| PIU | **मुख्य कार्यक्षेत्र** |
|---|---|
| Infrastructure PIU | DPR/design/BOQ, civil works, tender, construction quality, progress, commissioning, accounts and record keeping and all allied issues. |
| Procurement PIU | Procurement planning, bidding, evaluation support, Procurement and Contract Management, compliance, accounts and record keeping and all allied issues. |
| Digital Health PIU | Digital ecosystem, EHR/ABHA integration, applications, interoperability, State Level Digital dashboards, telemedicine, AI, cyber security, accounts and record keeping and all allied items & services. |
| Technical PIU | Technical appraisal, NCD Screening Equipment innovation, AI, infrastructure-related technical support, ADB technical coordination, accounts and record keeping and all allied issues. |

सदर कक्षासाठी आवश्यक मनुष्यबळ IT/Non-IT/इतर मान्यता प्राप्त संस्था/ अन्य मार्गाने लक्षित कार्य/उद्दिष्टांसाठी (Targeted Objectives) किंवा लक्षित परिणाम (Targeted Outcome) साठी प्रचलित नियमानुसार घेण्यात येतील. याची व्याप्ती आणि संरचना आवश्यकते नुसार शासनाच्या मान्यतेने वाढविता/बदलता येईल.

**"मित्र" तांत्रिक सहाय्य नोडः**

PMU/PIU मधील चार तांत्रिक अधिकारी तांत्रिक सहाय्य, नवकल्पना मूल्यांकन आणि ADB समन्वयासाठी मित्रा येथे नियुक्त केले जातील. तसेच डिजिटल आरोग्य PIU आणि तांत्रिक PIU मध्ये खरेदी नियोजन व करार व्यवस्थापन, EHR, ABHA, डॅशबोर्ड आणि दूरआरोग्य प्रणाली, NCD, कर्करोग, AI, रेफरल आणि क्षमता-वृद्धी सहाय्य यासाठी "मित्रा" तांत्रिक सहाय्य करेल.

## ८) आर्थिक व्यवस्था-

प्रस्तुत प्रकल्पासाठी असंसर्गजन्य आजारासाठी रु.१५४९.९० कोटी, महाराष्ट्र हेल्थ टेक्नॉलॉजी मिशनसाठी रु.११७३ कोटी, प्रकल्प अंमलबजावणी यूनिट (PMU/PIU) साठी रु. २७ कोटी, पायाभुत सुविधा व सक्षमीकरणासाठी रु. १५०० कोटी व त्याकरिता लागणाऱ्या मनुष्यबळ निर्मिती करता रु. १४७ कोटी (आवर्ती) इतका अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

प्रकल्पासाठी आवश्यक भांडवली व महसुली खर्चाकरिता नियोजन विभाग, वित्त विभाग व महालेखापाल यांच्या सहमतीने स्वतंत्र लेखाशीर्ष निर्माण करण्यात येतील. सदर प्रकल्पांतर्गत निर्माण करण्यात येणाऱ्या नियमित पदांच्या वेतनावरील खर्च त्या-त्या लेखाशिर्षाखालील मंजूर अर्थसंकल्पिय अनुदानातून भागविण्यात येईल.

## ९) प्रकल्प निरीक्षण व मूल्यमापन-

राज्यस्तरीय digital dashboard विकसित करून KPIs च्या आधारे त्रैमासिक व वार्षिक प्रगतीचे मूल्यमापन करण्यात येईल. प्रमुख निर्देशकांमध्ये population-based screening, NCD control rate, cancer screening/treatment, mental health service availability, palliative care coverage, digital health records, continuum of care, beneficiary satisfaction, out-of-pocket expenditure व district-wise performance यांचा समावेश राहील. ADB मार्गदर्शक सूचनांनुसार Third Party Evaluation, Financial Audit, Social & Environmental Monitoring व Outcome Evaluation करण्यात येईल.

## १०) अपेक्षित फलनिष्पत्ती-

प्रगती प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे राज्यामध्ये पुढील प्रमुख परिणाम अपेक्षित आहेत:-

- सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा विशेषत: असंसर्गजन्य आजारांचे लवकर निदान व उपचार अधिक सक्षम होईल आणि त्यामुळे होणारे अकाली मृत्यू कमी होण्यास मदत होईल.

- असंसर्गजन्य आजारांच्या सेवा, कर्करोग प्रतिबंधात्मक सुविधा अधिक प्रभावी बनल्याने नागरिकांचा स्वतःच्या खिशातून होणारा आरोग्य खर्च (Out-of-Pocket Expenditure - OOPE) कमी होण्यास मदत होईल.
- महाराष्ट्र हेल्थ टेक्नॉलॉजी मिशन च्या सर्वसमावेशक अंमल बजावणीमुळे आरोग्य सुविधा लोकाभिमुख होऊन आरोग्य सुविधा अधिक प्रभावीपणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचतील.
- आरोग्य सेवांची गुणवत्ता, कार्यक्षमता, पारदर्शकता व उत्तरदायित्व वाढेल.

**११)** सदर शासन निर्णय मा. राज्य मंत्रिमंडळाची दि.०८/०९/२०२६ रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

**१२)** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०९१५१२१०१३२४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dr. URMILA VAIBHAV JOSHI

Digitally signed by Dr. URMILA VAIBHAV JOSHI
DN: cn=Dr. URMILA VAIBHAV JOSHI, o, ou, email=urmila.joshi79@nic.in, c=IN
Date: 2026.09.15 13:19:59 +05'30'

( डॉ. उर्मिला जोशी )
शासनाचे उप सचिव

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास ,गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री (रा.उ.शु., क्रि.व यु.क., अ.क.व औ.) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (सा.आ. व कु.क.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (सा.आ. व कु.क.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव-१/सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. आयुक्त, आरोग्य सेवा, आयुक्तालय, मुंबई.

१२. सर्व आयुक्त, महानगरपालिका.
१३. सर्व जिल्हाधिकारी.
१४. संचालक ADB.
१५. उपसंचालक, आरोग्य सेवा, सर्व मंडळ विभाग.
१६. सर्व जिल्हा शल्यचिकित्सक.
१७. सर्व संबंधित आरोग्य संस्थाचे वैद्यकिय अधिक्षक.
१८. सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी.
१९. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी.
२०. निवड नस्ती (पासु-२).